**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्टं सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587



दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे






वर्ष ५ । अंक ३०४ । शुक्रवार ४ सप्टेंबर २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322


## डीजे मुक्त गणेशोत्सव साजरा करा; पारंपारिक वाद्यांचा वापर करा

### विश्व हिंदू परिषदेचे गणेश मंडळांना आवाहन





**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** यंदाचा गणेशोत्सव डीजे मुक्त, पारंपारिक पद्धतीने आणि भक्तीपूर्ण वातावरणात साजरा करावा, असे आवाहन विश्व हिंदू परिषदेचे वतीने करण्यात येत आहे. गणेशोत्सव हा हिंदू धर्मातील अत्यंत पवित्र आणि मंगलमय सण आहे. या उत्सवाचे पावित्र्य जपण्यासाठी डीजे सारख्या कर्णकर्कश आणि हानिकारक ध्वनिप्रदूषणाला फाटा देणे गरजेचे आहे. त्याऐवजी ढोल, ताशा, सनई, चौघडा, तुतारी अशा आपल्या पारंपारिक वाद्यांच्या मंगलमय गजरात श्री गणेशाची स्थापना आणि विसर्जन मिरवणूक काढावी, जेणेकरून उत्सवाची खरी सांस्कृतिक ओळख जपली जाईल.

डीजेच्या अतितीव्र आवाजामुळे लहान मुले, वृद्ध नागरिक,गरोदर महिला,आजारी व्यक्ती व हृदयरुग्णांना मोठा त्रास सहन करावा लागतो. अनेकांना हृदयविकाराचा आणि बहिरेपणाचा धोका निर्माण होतो. हा आवाज आपल्या धार्मिक भावनेला आणि भारतीय संस्कृतीला बाधा आणणारा आहे.

गणेशोत्सव ही केवळ मिरवणूक नसून ती आपली संस्कृती आहे. या काळात अनेक गणेश मंडळे रक्तदान शिबिरे, आरोग्य शिबिरे, ऐतिहासिक व पौराणिक देखाव्यांतून समाजप्रबोधन असे अनेक समाजोपयोगी उपक्रम राबवित असतात.या सामाजिक कार्याला डीजे मुक्त उत्सवामुळे ■ पान ४ वर

## गर्दीचा फायदा घेऊन मंगळसूत्र लांबवणारी बीडची टोळी गजाआड

### एलसीबीची कारवाई । पावणेसात लाखांचे गंठण जप्त

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** बसस्थानकांवरील गर्दीचा फायदा घेऊन महिला प्रवाशांचे दागिने चोरणाऱ्या बीड येथील तीनजणांच्या सराईत टोळीला स्थानिक गुन्हे शाखेने ताब्यात घेतले असून, त्यांच्याकडून ६ लाख ७५ हजार रुपये किमतीचे ४५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे गंठण जप्त करण्यात आले आहे.

कर्जत येथील शिक्षक कॉलनीतील रहिवासी अयोध्या दिगंबर कोरडे (वय ६२) या २७ ऑगस्ट २०२६ रोजी कर्जत बसस्थानकातून एसटी बसमध्ये चढत असताना चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने लांबवले होते. या प्रकरणी कर्जत पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३०३ (२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता.

अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या सूचनेनुसार, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या पथकाने तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे ३ सप्टेंबर रोजी पोलिसांनी मिरजगाव बस स्थानक परिसरात सापळा रचून परशुराम मल्हारी गायकवाड (वय ४५, रा. बीड), लक्ष्मी संजय लोखंडे (वय ५९, रा. वडवणी, जि. बीड) व पूजा विशाल मोहिते (वय २७, रा. बीड) या तिघांना ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान आरोपींनी कौसाबाई सर्जेराव गायकवाड (रा. बीड, सध्या फरार) हिच्या मदतीने गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपी परशुराम गायकवाड याने नातेवाईकाकडे ठेवलेले पावणेसात लाख रुपयांचे ४५ ग्रॅम सोन्याचे गंठण पोलिसांनी जप्त केले आहे. आरोपींना पुढील तपासासाठी कर्जत पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि संतोष मुटकुळे, अंमलदार श्यामसुंदर जाधव, प्रताप देवकाते, अमोल कोतकर, मनोज साखरे व सहकाऱ्यांच्या पथकाने केली.



## कुंटणखान्यावर छाप्यात दोन महिलांची सुटका

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** रेल्वेस्टेशन परिसरात सुरू असलेल्या कुंटणखान्यावर स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने ३ सप्टेंबरला छापा टाकून दोन पीडित महिलांची सुटका केली. या प्रकरणी कुंटणखाना चालवणाऱ्या एका ४४ वर्षीय महिलेवर कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रेल्वेस्टेशन परिसरातील संजीवनी कॉलनी, पानसरेवाडा येथे राहणारी झिनत फैय्याजअली महंमद ■ पान ४ वर

## महाराष्ट्र कारागृह ध्वज दिन जिल्हा कारागृहात साजरा

### आर्ट ऑफ लिव्हिंगच्या सहकार्याने बंद्यांसाठी देशभक्तीपर सांस्कृतिक कार्यक्रम

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महाराष्ट्र कारागृह व सुधारसेवा विभागाच्या ''सुधारणा व पुनर्वसन'' या ब्रीदवाक्याला अनुसरून अहिल्यानगर जिल्हा कारागृहात १ सप्टेंबर रोजी महाराष्ट्र कारागृह ध्वज दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

ध्वज दिनाचे औचित्य साधून अहिल्यानगर जिल्हा कारागृह आणि आर्ट ऑफ लिव्हिंग यांच्या संयुक्त विद्यमाने बंद्यांमध्ये सकारात्मक ऊर्जा, राष्ट्रभक्ती आणि मनपरिवर्तन



घडवून आणण्यासाठी देशभक्तीपर सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात जिल्ह्यातीलप्रसिद्ध गायक ■ पान ४ वर

## सभापती प्रा. शिंदेंच्या पाठपुराव्याने भैरवनाथ उपसा सिंचन योजना होणार

### प्राथमिक सर्वेक्षणास ८६ लाख मंजूर

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** कर्जत तालुक्यातील मिरजगाव येथील भैरवनाथ उपसा जलसिंचन योजनेच्या प्राथमिक सर्वेक्षणास ८६ लाख २४ हजार रुपयांची प्रशासकीय मान्यता महायुती सरकारने दिली आहे. विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी या योजनेला मंजुरी मिळण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा केला होता. त्यास यश येऊन या योजनेच्या सर्वेक्षणाचे काम आता सुरू होणार आहे व या सर्वेक्षणानंतर ही योजना प्रत्यक्षात येण्याच्यादृष्टीने प्रशासकीय प्रक्रिया सुरू होणार आहे. मिरजगाव परिसरातील तब्ब्ल १९ गावांच्या कृषी क्षेत्राला या योजनेचा लाभ होणार आहे.

कर्जत तालुक्यातील मिरजगाव येथील भैरवनाथ उपसा सिंचन योजनेच्या प्राथमिक सर्वेक्षण, अन्वेषण व संकल्पन कामाच्या अंदाजपत्रकास ८६ लाख २४ हजार ५८७ रुपये इतक्या रकमेची प्रशासकीय मान्यता राज्य शासनाच्या मृद व जलसंधारण विभागाने दिली आहे.



मिरजगाव परिसरातील लागवडीयोग्य क्षेत्रापैकी मोठा भाग सीना डावा कालव्याच्या लाभक्षेत्रात येत असला तरी या क्षेत्रातील तुलनेने कमी शेतकर्यांना कालव्याच्या पाण्याचा लाभ मिळतो. उर्वरित शेतकरी पावसाच्या पाण्यावर अवलंबून असल्याने पावसाळा वेळेवर न झाल्यास फळबागा व इतर पिकांच्या सिंचनावर परिणाम होऊन शेतकर्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागते. ही बाब लक्षात घेऊन सभापती प्रा. शिंदे यांनी या योजनेसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा केला होता. त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला व योजनेच्या सर्वेक्षणास मंजुरी दिली आहे. जलसंधारण मंत्री संजय राठोड व राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनीही यासाठी सहकार्य केले.

प्रस्तावित भैरवनाथ उपसा सिंचन योजनेअंतर्गत एकूण १२ बंधारे भरले जाणार आहेत. या बंधार्यांमध्ये सीना डाव्या कालव्याचे पाणी सोडल्यास शेतकर्यांना रब्बी व उन्हाळी हंगामात सिंचनासाठी पाणी उपलब्ध होण्यास मदत होणार आहे तसेच बंधार्यांमधील पाण्यामुळे भूजल पातळी वाढण्यास आणि परिसरातील शेतकर्यांना शाश्वत सिंचन सुविधा उपलब्ध होण्यास हातभार लागणार आहे. या योजनेसाठी प्राथमिक सर्वेक्षण, अन्वेषण व संकल्पन कामाचे अंदाजपत्रक ■ पान ४ वर

## योगविद्याधामचा ४१ वा वर्धापन दिन उत्साहात; सीना योग महाविद्यालयाचे दिमाखात उद्घाटन

### एम.ए. योगशास्त्र अभ्यासक्रमाची संधी; तरुण पदवीधरांनी लाभ घेण्याचे उपमहापौर धनंजय जाधव यांचे आवाहन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** योगविद्याधाम, अहिल्यानगरचा ४१ वा वर्धापन दिन तसेच योगविद्याधाम अहिल्यानगर संचलित सीना योग महाविद्यालयाचे उद्घाटन रविवार, दि. ३० ऑगस्ट रोजी उत्साहपूर्ण व आनंददायी वातावरणात संपन्न झाले. अहिल्यानगर महानगरपालिकेचे उपमहापौर धनंजय जाधव यांच्या हस्ते सीना योग महाविद्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी योगविद्याधामचे अध्यक्ष डॉ. सुंदर गोरे, संस्थापक सदस्य दत्ता दिकोंडा, जयंत वेसीकर, अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे सरव्यवस्थापक सुरेश पाटील, रूपेश झंवर यांच्यासह सुमारे शंभर



योग शिक्षकांची उपस्थिती होती.

अहिल्यानगर शहरामध्ये गेल्या ४१ वर्षांपासून योगविद्याधामच्या माध्यमातून योगविद्येचा सातत्याने प्रचार व प्रसार केला जात आहे. योगाच्या माध्यमातून नागरिकांना निरोगी जीवनशैलीचा मार्ग दाखविण्याबरोबरच योगशिक्षणाचा प्रसार करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य संस्थेने केले आहे. संस्थेच्या ४१ व्या वर्धापन दिनानिमित्त शिक्षक मेळाव्याचेही आयोजन करण्यात आले होते. यावेळी संस्थेच्या आजवरच्या कार्याचा आढावा घेत योगशिक्षकांच्या योगदानाचे कौतुक करण्यात आले.

विशेष म्हणजे, दि. ३० ऑगस्ट हा योगमहर्षी स्वामी कुवलयानंद यांचा जन्मदिन आहे. स्वामी कुवलयानंद यांनी लोणावळा येथे सन १९२४ मध्ये कैवल्यधाम या योगसंस्थेची स्थापना करून योगविद्येला शास्त्रीय अधिष्ठान देण्याचे तसेच योगाचा देश-विदेशात प्रचार करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. त्यांच्या कार्याची प्रेरणा घेत योगविद्याधामच्या माध्यमातून गेल्या चार दशकांहून ■ पान ४ वर


**कोणत्याही प्रकारचे कर्ज आता त्वरीत मिळवा!**
गरजेला नक्कीच मदत आमची, उभे राहण्याची हिंमत तुमची !
**राघव लोन सर्व्हिसेस**
व्यावसायिक कर्ज 75 लाखांपर्यंत (विनातारण)
सर्व प्रकारच्या कर्ज सुविधा
जुन्या जेसीबी,ट्रॅक्टर, हायवा,कार, इ. साठीही कर्ज पुरवठा
▪ जलद मंजुरी ▪ कमी व्याजदर ▪ सुलभ हफ्ते







**विनातारण कर्ज**
- व्यवसायीक व पगारदारांसाठी खास सी.सी / ओ.डी सुविधा
- डॉक्टर लोन
- आकर्षक व्याजदर

**तारण कर्ज**
- घर,एन.ए प्लॉट,व्यवसायिक मालमत्ता यासाठी कर्ज सुविधा
- आर.झोन,गुंठेवारी,ग्रामपंचायत हद्दीतील मालमत्ता यावरही त्वरीत कर्ज

**वाहन कर्ज**
- नविन व जुन्या कारसाठी कमीत कमी व्याजदरात त्वरीत कर्ज
- व्यावसायिक वाहनांसाठी शासकीय अनुदान

विनातारण व्यावसायिक कर्जासाठी आवश्यक कागदपत्रे : ▸ पॅन कार्ड ▸ आधार कार्ड ▸ शॉप ॲक्ट ▸ उद्यम आधार ▸ मागील तीन वर्षांचे आयटीआर ▸ बँक अकाऊंट स्टेटमेंट (पीडीएफ मध्ये) ▸ जीएसटी सर्टिफिकेट ▸ लाईट बिल ▸ फोटो

सर्व प्रकारच्या व्यवसायासाठी शासकीय कर्ज योजनांचे ऑनलाईन फॉर्म भरुन मिळतील तसेच कर्जासाठी योग्य मार्गदर्शन केले जाईल
अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ | मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम | ओ.बी.सी. महामंडळ योजना
(टीप - या योजनांसाठी सेवाशुल्क आकारले जाईल)

नियम व अटी लागू
700+ सिबिल स्कोअर 700+ असल्यास प्राधान्य
कोणतेही चालू कर्ज थकीत नसावे
आम्ही संपूर्ण महाराष्ट्रात कर्ज सेवा देतो
नामांकीत बँका व एनबीएफसी चे अर्थसहाय्य उपलब्ध !

**अधिक माहितीसाठी संपर्क : 9960283285**
पत्ता : शॉप नंबर 29,स्टेट बँके समोर,सुरजनगर,शिरुर,ता.शिरुर

## दै. आकर्षण निवडक

### जिव्हेश्वर शिवालयात श्रावण मास निम्मित रविवारी विविध कार्यक्रम

अहिल्यानगर- सावेडी येथील गावडे मळा, आर्ट ऑफ लिव्हिंग समोर, पाईप लाईन रोड येथील जिव्हेश्वर शिवालय मंदिरात श्रावण महिन्याच्या निम्मिताने सलग ४ थ्या वर्षी स्व.श्रीनिवास जयकुमार कनोरे यांच्या प्रेरणेने धार्मिक व सामाजिक उपक्रम रविवार, दि.०६ सप्टेंबर रोजी कार्यक्रम आयोजित करण्यात आले असल्याची माहिती आयोजन वैभव आहेर यांनी दिली. जिव्हेश्वर भक्त सेवा मंडळाच्या या मंदिरात प्रतिवर्षीप्रमाणे पवित्र श्रावण मास निमित्त सकाळी अभिषेक नंतर राधिका ग्रुप (महिला मंडळ) भजन सकाळी १० वा वृक्षारोपण कार्यक्रम सकाळी ११ वा.नंतर आरती व महाप्रसाद दुपारी १२ वा.होणार आहे यावेळी प्रमुख आकर्षण बाबा बर्फानी अमरनाथ (भव्यदिव्य बर्फाचे शिवलिंग) असणार आहे. महाप्रसाद(अन्नदाते) सुखदेव शेडाळे,मंगल राजेन्द्र शेडाळे,श्रध्दा राजेंद्र शेडाळे,शिवजीत बलभिमराव डोके हे आहेत तर विशेष सहकार्य श्रीमती निलिमा कनोरे, मृणाल कनोरे,अध्यक्षा, जिव्हेश्वर भक्त सेवा मंडळ,मंदा पिंपरकर,सोमनाथ खाडे,प्रकाश मारवाडे यांचे आहे.यावेळी हिंदुधर्मरक्षक आमदार संग्रामभैय्या जगताप, नगरसेवक संपतदादा बारस्कर,विजय श्रीधर पुंडे (गुरुजी),संजय झिंजे, संदिपभाऊ दातरंगे, सुनिल भाऊ त्र्यंबके,सागर मुर्तडकर,डॉ. सागर बोरुडे, चंद्रकांत शेळके (काका), महेश कांबळे (पत्रकार),कुलदिपभाऊ भिंगारदिवे, अमित खामकर,रोशनी त्र्यंबके,किरणताई बारस्कर,छायाताई राजपुत दिवाणे, स्नेहल कौसल्या,बाबासाहेब गेरंगे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहे. स्वकुळसाळी हितसंवर्धक मंडळ,भगवान श्री जिव्हेश्वर मंदिर(दिल्लीगेट),स्वकुळसाळी महिला मंच,जय जिव्हेश्वर प्रतिष्ठान, जिव्हाळा प्रतिष्ठान,माता अंकिनी दशांकिनी महिला मंडळ, नर्मदेश्वर महादेव मंदिर,श्री बेलेश्वर ग्रुप,मनोहर कलेक्शन,कापड बाजारयांचे सहकार्य आहे सर्व भाविकांनी कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजक श्री व सौ. वैभव संभाजी आहेर,युवक अध्यक्ष, पुजारी व जिव्हेश्वर भक्त सेवा मंडळ,सावेडी यांनी केले आहे.

### निमगाव वाघाच्या ग्रामसभेत पै. नाना डोंगरे यांचा सत्कार

अहिल्यानगर - नगर तालुका तालीम सेवा संघाच्या अध्यक्षपदी पै. नाना डोंगरे यांची फेरनिवड झाल्याबद्दल निमगाव वाघा (ता. नगर) ग्रामपंचायतीच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. गावात नुकतीच झालेल्या ग्रामसभेत पै. डोंगरे यांच्या फेरनिवडीबद्दल अभिनंदनाचा ठराव करण्यात आला. त्यांच्या माध्यमातून तालुक्यातील कुस्ती क्षेत्राला सातत्याने मिळत असलेल्या प्रोत्साहनाचे ग्रामस्थांनी कौतुक केले. यावेळी उपसरपंच किरण जाधव, ग्रामविकास अधिकारी प्रविण पानसंबळ आणि केंद्रप्रमुख अतुल काकडे यांच्या हस्ते पै. नाना डोंगरे यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी अनिल डोंगरे, सागर कापसे, सोसायटीचे चेअरमन अतुल फलके, वसंत फलके, गणेश येणारे, राजू जाधव, पिंटू जाधव आदी उपस्थित होते. पै. नाना डोंगरे यांच्या फेरनिवडीबद्दल साहेबराव बोडखे मित्र मंडळाच्या वतीनेही त्यांचा सत्कार करण्यात आला. भागचंद जाधव यांच्या हस्ते डोंगरे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी साहेबराव बोडखे, भाऊसाहेब जाधव, भरत बोडखे, प्रमोद जाधव, प्रशांत जाधव, आनंद गावडे आदी उपस्थित होते.नगर तालुका तालीम सेवा संघाच्या माध्यमातून तालुक्यातील कुस्ती क्षेत्राला सातत्याने प्रोत्साहन देण्याचे काम केले जात आहे. संघाच्या वतीने विविध कुस्ती स्पर्धांचे आयोजन केले जाते. त्याचबरोबर विविध स्पर्धांसाठी खेळाडूंच्या निवड चाचण्या घेऊन गुणवंत मल्लांची निवड केली जाते.

### मुरलीधर रोहोकले यांचे निधन



अहिल्यानगर - अहिल्यानगर येथील रहिवासी मुरलीधर नानासाहेब रोहोकले यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. ते ८६ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात ४ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथून क्रीडा प्रशिक्षक या पदावरून ते सेवानिवृत्त झाले होते. त्यांच्या कार्यकाळात विविध क्रीडा प्रकारांत खेळाडुंनी नैपुण्य मिळविले होते. ते महाराष्ट्र राज्य हॉलीबॉल असोसिएशनचे उपाध्यक्ष, पारनेर सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक, रयत शिक्षण संस्था उत्तर विभाग जनरल बॉडी सदस्य होते. त्यांना मोठा मित्रपरिवार होता. ते मनमिळावू स्वभावाचे म्हणून परिचित होते. त्यांच्या निधनामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

### हाजी सय्यद सलीम छोटूमिया जहागीरदार यांचे निधन



अहिल्यानगर - हाजी सय्यद सलीम छोटुमिया जहागीरदार रा. फकीरवाडा दि. ३/९/२०२६ रोज़ी राहत्या घरी त्याच्ये अल्पसाअजाराने निधन झाले फकीरवाडा.दमबाराहजारी कब्रस्तान येथे दफन विधी करण्यात आला असून त्यांच्या मागे दोन मुल व एक मुलगी असा परिवार आहे. हाजी सलीम छोटुमिया हे नाशिक येथे विभागीय समाजकल्याण कार्यल्यायत लेखा अधिकारी म्हणुन कार्यरत होते त्यांच्या निधनाने फकीरवाडा परीसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# आविष्कार स्पर्धेच्या कार्यशाळेचा कार्यक्रम उत्साहात

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** के. जी.महाविद्यालयात विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती, सर्जनशीलता व नवकल्पनांना प्रोत्साहन देण्यासाठी आविष्कार स्पर्धेच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

आविष्कार कार्यशाळा या कार्यक्रमास महाविद्यालयाचे विश्वस्त संचालक माननीय श्री किशोरजी मुनोत तसेच परिसर संचालिका माननीय डॉ. स्वाती मुनोत यांनी कार्यशाळेत आविष्कार स्पर्धेचे स्वरूप, संशोधन प्रकल्पाची निवड, संशोधन पद्धती, प्रकल्प मांडणी, नावीन्यपूर्ण संकल्पना तसेच प्रकल्पाचे सादरीकरण याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.तसेच प्रा. स्नेहल बोरोवके यांनी संशोधनाचे महत्व आणि आविष्कार स्पर्धेतील सहभागाचे फायदे समजावून सांगितले. आविष्कार समन्वयक डॉ. वर्षा कीर्तने यांनी प्रस्ताविकात संशोधन कार्यशाळेच्या आयोजना मागील उद्देश स्पष्ट केला.तज्ज्ञ मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांचे निरसन करून त्यांना आवश्यक सूचना दिल्या.प्रा. योगेश चकोते यांनी आभारप्रदर्शन केले. यावेळी प्रा. रोहिणी क्षीरसागर तसेच सौ. हर्षाली रासकर आणि विध्यार्थी उपस्थित होते.

# संतपीठातील वसतिगृह सुरू करण्याची मागणी

**संतपीठातील मुलांचे वसतिगृह सुरू करा; संतपीठ पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्याची मागणी**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण –** दक्षिण काशी पैठण येथील संतपीठाच्या जागेत गेल्या अनेक वर्षांपासून मुलांच्या वसतिगृहाची इमारत उभी आहे. वापराअभावी जीर्ण झालेली ही इमारत पुन्हा बांधण्यात आली असतानाही विद्यार्थ्यांसाठी अद्याप वसतिगृहाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली नाही. त्यामुळे नागरिकांसह तरुण वारकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

संतपीठासाठी आवश्यक असलेली पुरेशी जागा शासनाच्या ताब्यात आहे. संतांच्या विचारांचा संस्कार करून सुसंस्कृत पिढी घडविण्यासाठी विविध अभ्यासक्रम पूर्ण क्षमतेने सुरू करण्याची गरज आहे. मात्र, संतपीठाच्या विकासाचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याने शासनाच्या भूमिकेबाबत नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

सद्यस्थितीत संतपीठात सहा महिने तसेच एक वर्ष कालावधीचे संतविषयक अभ्यासक्रम सुरू आहेत. मात्र, विद्यार्थ्यांच्या निवासासाठी तयार करण्यात आलेले वसतिगृह सुरू झालेले नसल्याने त्याचा अपेक्षित लाभ विद्यार्थ्यांना मिळत नाही.

मराठवाडा विकासाच्या ४२ कलमांतर्गत पैठण येथे संतपीठ उभारण्याची घोषणा शासनाने सन १९८१ मध्ये केली होती. त्यानंतर चार दशकांहून अधिक काळ लोटला तरी संतपीठाचा अपेक्षित विकास पूर्ण झालेला नाही. त्यामुळे संतांचे विचार आणि संस्कृती पुढील पिढीपर्यंत पोहोचविणाऱ्या या महत्त्वपूर्ण प्रकल्पाकडे शासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी होत आहे. पंतप्रधान कार्यालय आणि मुख्यमंत्री कार्यालयाने या प्रश्नात लक्ष घालून संतपीठ पूर्ण क्षमतेने तातडीने सुरू करावे तसेच विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहाची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी तरुण वारकरी आणि नागरिकांकडून करण्यात येत आहे.श्रावणात बारा महादेवांच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी

# शिक्षकांना समर्पित असा हा ५ सप्टेंबर शिक्षक दिन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भारतीय संस्कृतीत शिक्षकाला महत्वाचे स्थान आहे. मातृ देवो भव, पितृ देवो भव, आचार्य देवो भव असे म्हटले गेले, म्हणजे आईवडिला नंतर गुरुचे स्थान आहे. आपल्या संस्कृतीत गुरुशिष्य परंपरेला मान दिलेला आहे. तसेच शिक्षक व विद्यार्थी या दोघांमध्ये आदराचे व प्रेमाचे नाते असते असे समजले जाते.

मी एक शिक्षक आहे. त्यामुळे शिक्षण क्षेत्रातल्या अनेक व्यक्ती माझ्या मनात ठाण मांडून बसलेल्या आहेत. पार्थ गुरु श्रीकृष्ण हा अर्जुन श्रीकृष्ण संवाद आपण गीता स्वरुपात मानतो. फक्त पक्षाचा डोळाच पहाण्याची एकाग्रता शिकवणारे गुरु द्रोणाचार्यही आपणांस माहिती आहेत. नमस्तुते व्यास विशाल बुद्धे म्हणत आपण व्यासांनाही गुरुपद दिलेले आहे. मध्यममार्ग शिकवणारे गुरु गौतम बुद्ध, चंद्रगुप्त मौर्याला राजा बनवणारे आर्य चाणक्य हेही प्रसिद्ध आहेत. आद्यगुरु शंकराचार्यही वंद्य आहेत.

अथेन्समधल्या तरुणांना प्रश्नोत्तर पद्धतीचा उपयोग करुन चर्चेद्वारे ज्ञान करुन देणारा सॉक्रेटिस व मुक्या बहि-या व अंध हेलनकेलरची शिक्षिका अँन सुलिव्हॅन पाश्चिमात्य जगात गुरुपदी विराजमान आहेत. ॲनने हेलनच्या हातावर फक्त बोटांनी ठोके मारुन जग समजावून सांगितले, आणि शिकवले.

इसापने गोष्टी सांगून इसापनिती शिकवली हॅन्स ख्रिश्चन अंडरसनने परीकथेतून मुलांना अदभुत रसाचे दर्शन घडवले. आर्य भट, वराहमिहिर यांनी गणित शिकवले.

आजकालच्या काळातले डॉ. राधाकृष्णन, डॉ.झाकिर हुसेन, डॉ. अब्दुल कलाम, कर्मवीर भाऊराव पाटील, धोंडो केशव कर्वे, सावित्रीबाई फुले, आणि अनेक ही यादी न संपणारीच आहे. तथापि असे अनेक शिक्षक ज्यांची नावे काळाच्या प्रवाहात लुप्त झाली आहेत. तरीही त्यांनी दिलेल्या शास्त्रीय संकल्पसा, विचार, तत्वे आजही अभ्यासली जात आहेत. शाश्वतच आहेत ही शिक्षण तत्वे.

शिक्षकांना आयुष्यात, अनेकानेक भूमिकाही पार पाडाव्या लागतात. जवळजवळ रोजच कधीही नट, कधी मित्र, कधी परिचारक, कधी प्रशिक्षक, कधी मार्गदर्शक तरे गरीब विद्यार्थ्यांसाठी सावकारी सुद्धा कधीकधी करावी लागते कधीकधी विद्यर्थ्यांच्या मातापित्याचीही भूमिकाही निभवावी लागते.आणि मानसशास्त्राचे या अभ्यासाने आश्वासक बनुन विद्याथ्यांना हुरूप द्यावा लागतो.

नकाशे, तक्ते, खडू, फळा, सूत्रे, क्रियापदे, कथानके आणि पुस्तके यांच्याशिवाय शिक्षक काम करा नाहीत खरे आहे पण सत्य हे आहे की जर शिष्याची स्वेच्छा, स्वतःची इच्छा असेल तरच शिक्षक शिकवू शकतात.

शिक्षक वर्गाला मोठ्या आवाजात शिकवत असतो पण खरं म्हणजे विद्यार्थ्यांच्या छोट्या छोच्या आवाजातल्यो शंकाचे अडथळे दुर करत तो रोजच नवे नवे मार्ग शोधत असतो म्हणजे रोज्च तो स्वतःही शिकत असतो. रोज नव्या शंका कुशंका, नव्या कल्पना, नवै संकल्प आणि नवीन मैत्री असा त्याचा अनुभव असतो.

जसे एखाद्या अभियंत्याला माहित असते की त्याने उभारलेली रचना वर्षानुवर्षे टिकवायची असेल तर त्याला ती अत्यंत काटेकोरपणे काळजीपूर्वक सादर करावी लागते त्याचप्रमाणे शिक्षकालाही हे माहित असते की प्रेमपूर्वक कळकळीने विद्यार्थ्यांच्या मनामनात पेरलेले त्याचे विचारच पुढे कायमचे संक्रमित होणार आहेत. त्यामुळे शिक्षक असतो एक योद्धा, विद्यार्थ्यांच्या

मनातल्या त–हेत–हेच्या नकारात्मक विचारांनी आणि मित्रांच्या दडपणाखाली दडपून गेलेल्या त्याच्या स्वत्वाला जागृत करण्यासाठी न्यूनगंड, भयगंड, अइंगड, पूर्वग्रहयुक्त कलुषित मते, अज्ञान यांच्याशी शिक्षकाला योद्धा बनुन लढावे लागते. सुबुद्धी, औत्सुक्य, पालकांचा पाठिंबा, विकसनशील व्यक्तिमत्व, सृजनशक्ती, विनोदबुद्धी, हास्यव्यंग, श्रद्धा, प्रेम ही शस्त्रे वापरून शिक्षक लढत राहतो. पालक आणि समाज त्यांचा बहुमूल्य ठेवा असलेली पुढची पिढी शिक्षकाच्या स्वाधीन करत असतात. शिक्षकाला सन्मान देतात.

शिक्षक व्यवसायाला रम्य भूतकाळ आहे, आव्हानात्मक वर्तमानकाळ आहे. विद्यार्थ्यां बरोबर सहवास घडवून आणणारा मौजमजेचा भविष्यकाळ ही आहे. शिक्षक दिनानिमित्त सर्व शिक्षकांनाश शुभेच्छा.

**लेखिका– वर्षा कुलकर्णी,**
**तपोवन नगर, सावेडी,**
**अहिल्यानगर (९२ ७० ४८ २४ ९३)**

# श्रावणात पैठणच्या बारा महादेवांच्या दर्शनासाठी भाविकांची मांदियाळी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण –** दक्षिण काशी म्हणून ओळख असलेल्या पैठण नगरीतील प्राचीन आणि ऐतिहासिक बारा महादेवांच्या दर्शनासाठी श्रावण महिन्यात भाविकांची मोठी गर्दी होत आहे. महाराष्ट्राच्या विविध भागांतून भाविक पारंपरिक पद्धतीने पैठणमध्ये दाखल होत असून, महादेव मंदिरांमध्ये अभिषेक, पूजाअर्चा आणि धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल सुरू आहे.

श्रावण महिन्यात काही भाविक संपूर्ण महिनाभर पैठणमधील बारा महादेवांचे दर्शन घेण्याची परंपरा जपतात. यामध्ये पिंपळेश्वर महादेव, गाडेश्वर महादेव, दोलेश्वर महादेव, गोदेश्वर महादेव, तारकेश्वर महादेव, हरहरेश्वर महादेव, कालिकेश्वर महादेव, इंद्रेश्वर महादेव, नागेश्वर महादेव, बाळलिंगेश्वर महादेव आणि सिद्धेश्वर महादेव आदी प्राचीन मंदिरांचा समावेश आहे.

श्रावणातील प्रत्येक सोमवारी तसेच अन्य दिवशीही या मंदिरांमध्ये भाविकांची गर्दी वाढत आहे. महादेवाचा अभिषेक, बेलपत्र अर्पण, पूजाअर्चा, चिंतन आणि विविध धार्मिक विधींसाठी भाविक पहाटेपासून मंदिरांकडे जात आहेत. पैठणच्या धार्मिक आणि ऐतिहासिक परंपरेला मोठा वारसा लाभला असून, श्रावण महिन्यात बारा महादेवांचे दर्शन घेण्याची प्रथा आजही भाविकांकडून श्रद्धेने जोपासली जात आहे. त्यामुळे श्रावणात पैठण नगरीत भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

# डीजे ध्वनीप्रदूषणाविरोधात भूमिका घेणाऱ्या विद्यानंद बापट यांच्यावरील हल्ल्याचा निषेध

**हल्लेखोरावर कठोर कारवाईची मुख्यमंत्र्यांकडे मागणी**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सार्वजनिक उत्सवांमध्ये डीजे व लाऊडस्पीकरमुळे होणाऱ्या ध्वनीप्रदूषणाविरोधात भूमिका मांडणारे पर्यावरणप्रेमी विद्यानंद बापट यांना पुण्यातील टिळक रोडवरील कशाळे चौकात गुरुवारी (३ सप्टेंबर) बेदम मारहाण झाल्याची घटना घडली. या घटनेचा हरिभूमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष अभय रामलाल ललवाणी यांनी तीव्र निषेध केला असून हल्लेखोरावर कठोर कारवाईची मागणी मुख्यमंत्र्यांकडे ई–मेल निवेदनाद्वारे केली आहे. ध्वनीप्रदूषण ही गंभीर सामाजिक व पर्यावरणीय समस्या असून, त्याविरोधात भूमिका मांडणाऱ्या पर्यावरणप्रेमींवर अशा प्रकारे हल्ला होणे अत्यंत निषेधार्ह आहे, असे ललवाणी यांनी म्हटले आहे. या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन श्री बापट यांच्यावर हल्ला करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. तसेच संबंधितांना तातडीने योग्य त्या कारवाईच्या सूचना द्याव्यात, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

# वीज वसुली पथकाला मारहाण; तुळजापुरातील दोघांविरुद्ध गुन्हा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण –** वीज चोरी रोखणे आणि थकीत वीजबिल वसुलीची मोहीम राबवत असलेल्या पथकाला अडवून तंत्रज्ञासह कर्मचाऱ्यांना मारहाण, शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना तुळजापूर परिसरात घडली. याप्रकरणी पैठण पोलिस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अंगद सुखदेव वनवे (वय ३२, रा. नवीन कवासान, पैठण) यांनी याबाबत फिर्याद दिली. त्यानुसार भागवत दत्तात्रय सोनवणे आणि महेश दत्तात्रय सोनवणे (दोघे रा. तुळजापूर, ता. पैठण) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुरुवारी (दि. ३) सकाळी दहाच्या सुमारास तुळजापूर गाव परिसरातील शहागड रोडवर वनवे व त्यांचे सहकारी वीज चोरी रोखणे आणि थकीत वीजबिल वसुलीची कारवाई करीत होते. यावेळी आरोपींनी कोणतेही कारण नसताना शासकीय कामात अडथळा निर्माण केला. तसेच फिर्यादी व साक्षीदारांना चापट–बुक्क्यांनी मारहाण करून शिवीगाळ केली आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे. घटनेप्रकरणी सायंकाळी ६.४७ वाजता पैठण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहेकॉ आर. पी. जिवडे करीत आहेत.




## एसटी महामंडळाचे सवलती बाबतचे कार्ड रिचार्ज करा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** १ सप्टेंबर पासून सवलत जी दिव्यांग ,तसेच ६५ वर्षा चे नागरिक आणि ७५ वर्षावरील जेष्ठ नागरिक यांना प्रवासात सवलत मिळते .त्या सवलती चे प्राप्त कार्ड रिचार्ज न केल्याने पूर्ण प्रवासाचे तिकीट घ्यावे लागते,याबाबत रिचार्ज करण्याची माहिती नसल्याने वाहक यांच्याबरोबर वादविवाद होण्याची शक्यता नाकारता येत नाही.त्यामुळे आपलं कार्ड एसटी कार्यालय कंट्रोल रूम वर रिचार्ज करावे.

# अहिल्यानगर-नाशिक ऑटो एलपीजी दरातील तफावत तपासा; रिक्षाचालकांना न्याय द्या

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर शहरातील ऑटो रिक्षाचालकांना एलपीजी गॅसच्या दरातील मोठ्या तफावतीमुळे आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असल्याचा आरोप करत या दराची तातडीने चौकशी करून गोरगरीब रिक्षाचालकांना न्याय व दिलासा द्यावा, अशी मागणी रिक्षाचालक संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची जिल्हा पुरवठा अधिकारी हेमा बडे यांच्या दालनात बैठक संपन्न झाली. यावेळी संघटनेचे अध्यक्ष अविनाश घुले, उपाध्यक्ष दत्ता वामन, नासिर खान, संजय सहाणे, प्रकाश गोसावी आदी उपस्थित होते.

रिक्षा चालवून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या शहरातील हजारो रिक्षाचालकांसमोर सध्या वाढता इंधन खर्च, वाहनाची देखभाल, दुरुस्ती, विमा, परवाना तसेच दैनंदिन कौटुंबिक खर्च अशा अनेक आर्थिक जबाबदाऱ्या आहेत. अशा परिस्थितीत ऑटो एलपीजीच्या दरात स्थानिक पातळीवर मोठी तफावत असल्यास त्याचा थेट परिणाम रिक्षाचालकांच्या उत्पन्नावर होत असल्याचे संघटनेने निवेदनात म्हटले आहे.

संघटनेच्या म्हणण्यानुसार, उपलब्ध कागदपत्रांमध्ये नाशिक जिल्ह्यात ऑटो एलपीजीचा दर प्रतिलिटर ५९.९४ रुपये, तर अहिल्यानगर शहरात ८४.४४ रुपये असल्याचे निदर्शनास आले आहे. दोन्ही जिल्ह्यांमधील



दरामध्ये प्रतिलिटर सुमारे २४.५० रुपयांची तफावत असल्याने हा फरक नेमका कशामुळे निर्माण झाला, असा सवाल रिक्षाचालकांनी उपस्थित केला आहे. इंधनाच्या किमती ठरविण्यामागील नियम, कररचना, वाहतूक खर्च, कंपनीनुसार दर किंवा इतर कोणते घटक कारणीभूत आहेत, याची प्रशासनाने स्पष्टता करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

अविनाश घुले म्हणाले, ''रिक्षा चालक हा शहरातील सर्वसामान्य नागरिकांच्या वाहतुकीचा महत्त्वाचा आधार आहे. दिवसभर रिक्षा चालवून मिळणाऱ्या उत्पन्नातून कुटुंबाचा खर्च भागविताना अनेक रिक्षाचालकांना मोठ्या आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. अशा परिस्थितीत अहिल्यानगर आणि नाशिक जिल्ह्यातील ऑटो एलपीजीच्या दरामध्ये एवढी मोठी तफावत का आहे, याचे उत्तर प्रशासनाने आणि संबंधित यंत्रणांनी देणे आवश्यक आहे. जर दर आकारणीमध्ये काही अनियमितता किंवा चुकीची पद्धत होत असेल तर त्याची तातडीने चौकशी करून संबंधितांवर कारवाई करावी.''

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### महंत योगी गेंडानाथजी महाराज यांच्या स्मृतीदिना निमित्त शनिवारी ५ रोजी महाप्रसादाचे आयोजन



अहिल्यानगर- अहिल्यानगरचे ग्रामदैवत श्री. विशाल गणेश मंदिराचे पुजारी महंत योगी गेंडानाथजी महाराज यांच्या २८ व्या पुण्यस्मृतीनिमित्ताने श्री विशाल गणेश सेवा मंडळाच्यावतीने शनिवार दि.०५ सप्टेंबर रोजी दु.१२ ते ३ या वेळेत महाप्रसादाचे आयोजन सप्तपदी मंगल कार्यालय, समाधी मंदिराजवळ, काटवन खंडोबा रोड, अहिल्यानगर या ठिकाणी करण्यात आले आहे.तसेच समाधीस्थळी विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे यामध्ये सकाळी ७ वाजता समाधी पूजन ,दुपारी १२ वाजता साधू,संत ,महंत यांच्या पावन उपस्थितीत पुष्पवृष्टी ,त्यानंतर साधू,-संतांची पंगत तरी भाविकांनी मोठ्या संख्येने महाप्रसादाचा लाभ घेण्याचे आवाहन श्री विशाल गणेश मंदिराचे महंत संगमनाथ महाराज यांनी केले आहे.

### जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक चाँद हुसेन शेख यांना दिल्लीचा महात्मा फुले राष्ट्रीय फेलोशिप सन्मान जाहीर



अहिल्यानगर - शैक्षणिक, क्रीडा, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे नागापूर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक चाँद हुसेन शेख यांना दिल्ली येथील भारतीय दलित साहित्य अकादमीच्या वतीने देण्यात येणारा महात्मा ज्योतीबा फुले राष्ट्रीय फेलोशिप सन्मान जाहीर झाला आहे. भारतीय दलित साहित्य अकादमीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. सोहनपाल सुमनाक्षर यांनी शेख यांना फेलोशिप जाहीर झाल्याचे कळविले आहे. १२ डिसेंबर रोजी दिल्ली येथे होणाऱ्या ४२ व्या अखिल भारतीय दलित साहित्य संमेलनात ही फेलोशिप मान्यवरांच्या हस्ते सन्मानपूर्वक त्यांना प्रदान करण्यात येणार आहे. मुख्याध्यापक चाँद हुसेन शेख यांनी शिक्षक म्हणून कार्यरत असताना अनेक विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देऊन त्यांना उज्ज्वल भविष्याची दिशा दिली आहे. विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करण्यासाठी त्यांनी विविध शैक्षणिक उपक्रम राबविले. ते स्वतः एक उत्कृष्ट कुस्तीपटू होते, त्यांनी अनेक खेळाडू देखील घडविले आहे. शाळा ही केवळ शिक्षण देणारी संस्था नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे केंद्र असावे, या विचारातून त्यांनी सातत्याने काम केले आहे. शैक्षणिक क्षेत्राबरोबरच सामाजिक कार्यातही त्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला आहे.

### हिंदू धर्मातील सर्वोच्य आणि पवित्र असलेल्या आदी कैलास, मोठा कैलास आणि ॐ पर्वत यात्रेचे आयोजन

अहिल्यानगर- हिंदू धर्मातील सर्वोच्य आणि पवित्र असलेल्या आदी कैलास, मोठा कैलास आणि ॐ पर्वत यात्रेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती नंदकुमार पोळ यांनी दिली. सदर यात्रा दि. २६ ऑक्टोबर ते ४ नोव्हेंबर २०२६ पर्यंत आहे. आदी कैलास हे भगवान शंकराचे निवासस्थान आहे. त्याला फार धार्मिक महत्व आहे. ही यात्रा फार पुरातन आहे. पांडवानी सुद्धा पापक्षालना साठी यात्रा केली होती. आदी कैलास समुद्र सपाटीपासून १८००० फूट उंचीवर आहे. आता भारत सरकारने या परिसरात संपूर्ण रस्त्यांचे जाळे उभारले आहे. त्यामुळे ही यात्रा पूर्ण वाहनाने होते. कुठेही चालावे लागत नाही.भारतातील भगवान शंकरांची पहिलीच तीर्थ यात्रा आहे, जिथे चालावे लागत नाही त्याचबरोबर या यात्रेत मोठा कैलासाच्या दर्शनाची सोय केली आहे. मोठा कैलास तिबेट मध्ये असल्याने चीन सरकारने या यात्रेवर बंधने आणल्यामुळे आता भारतातून च एक व्ह्यू पॉईट केल्याने मोठ्या कैलासा चे सुद्धा लांबून पण भारतातून दर्शन या यात्रेत होणार आहे. कुठलाही पासपोर्ट विजा लागणार नाही. त्याच बरोबर ॐ आकारच्या पर्वताचे या यात्रेत दर्शन होणार आहे. या यात्रेत जगप्रसिद्ध नीम करोली बाबा, गोलू देवमंदिर, पाताळ भुवनेश्वर, जागेश्वर धाम, महर्षी व्यास गुफा, मुळ काली माता या मंदिराचे सुद्धा दर्शन होणार आहे. पूर्ण यात्रा अहिल्यानगर ते अहिल्यानगर आहे. ज्यांना या यात्रेला सहभागी व्हायचे असेल, त्यांनी अभिजीत पोळ मो. नं. ९४२२२२७९०६ आणि नंदकुमार पोळ मो. नं. ७८७५५०००५६ पुष्पम टूर्स ऍण्ड ट्रॅव्हल्स, अहिल्यानगर यांच्याशी संपर्क साधावा.

## लक्ष्मीबाई भाऊराव पाटील शाळेत दहीहंडीचा जल्लोष!

**राधा-कृष्णाच्या वेशभूषेतील चिमुकल्यांनी जिंकली उपस्थितांची मने; गवळणी, कृष्णजन्माच्या गीतांनी रंगला । सोहळा 'हाथी घोडा पालखी... जय कन्हैया लाल की!' जयघोषाने दणाणला शाळा परिसर**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** शहरातील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक शाळेत श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त दहीहंडीचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. राधा आणि श्रीकृष्णाच्या वेशभूषेत सजलेल्या चिमुकल्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या गवळणी, कृष्णजन्माची गीते तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे संपूर्ण वातावरण भक्तिमय आणि जल्लोषमय झाले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांनी हिंदी-मराठी गीतांवर नृत्य, नाट्यरूप सादरीकरण आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. चिमुकल्यांच्या उत्स्फूर्त सादरीकरणाला उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली. शाळेच्या अंगणात आकर्षक रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या. फुले व रंगीबेरंगी फुग्यांनी परिसराची सुंदर सजावट करण्यात आली होती. दहीहंडी फोडण्याच्या क्षणी 'हाथी घोडा पालखी... जय कन्हैया लाल की!' या जयघोषाने संपूर्ण शाळा परिसर दणाणून गेला. लहानग्या गोविंदांच्या उत्साहात विद्यार्थी, शिक्षक आणि पालकही सहभागी झाले.

या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य ज्ञानदेव पांडुळे उपस्थित होते. प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका लक्ष्मीताई आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक महादेव भद्रे, प्राथमिकच्या शिक्षिका मीनाक्षी खोडदे, उर्मिला साळुंके, सुजाता दोमल, सोनाली अनभुल, रूपाली वाबळे, कांचन मदने, भारती सुसरे, भाग्यश्री लोंढे, कविता हिरणवळे, इंदुमती दरेकर, पूनम धाडगे, रूपाली पांडुळे, सौ. जगताप, बिडवे मावशी तसेच विद्यार्थी, शिक्षक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ज्ञानदेव पांडुळे म्हणाले की, दहीहंडी हा केवळ धार्मिक उत्सव नसून एकतेचे प्रतीक आहे. सण-उत्सवांच्या माध्यमातून विविधतेने नटलेल्या एकात्म भारताचे दर्शन घडते. समाजातील विविध घटकांना एकत्र आणण्याचे काम अशा उत्सवांमधून होते. विद्यार्थ्यांमध्ये आपल्या संस्कृतीविषयी अभिमान निर्माण करण्याबरोबरच एकात्मतेची भावना रुजविण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व असल्याचे त्यांनी सांगितले. हा उत्सव यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## श्रावणमासी हर्ष मानसी; गांजेगल्ली येथे शिवमहापुराण कथेला भक्तिमय प्रारंभ



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** श्रावण महिन्याच्या पावन पर्वात गांजेगल्ली, गंजबाजार येथे आयोजित करण्यात आलेल्या श्री शिवमहापुराण श्रावण कथा सोहळ्याला भक्तिमय वातावरणात उत्साहात सुरुवात झाली. दि. ६ सप्टेंबर पर्यंत दररोज सायंकाळी ५.३० ते ८.३० या वेळेत ही कथा होणार आहे. कथा प्रवक्ते प.पू. समर्थ भक्त मंदारबुवा रामदासी यांच्या रसाळ वाणीतून शिवमहापुराणाचे निरूपण केले जात आहे.

कथेच्या प्रारंभानिमित्त गंजबाजार येथील सोमेश्वर महादेव मंदिरापासून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. शोभायात्रेत मोठ्या संख्येने महिला कलशधारी सहभागी झाल्या होत्या. बँड पथक, सजविलेला रथ आणि त्यावर विराजमान असलेले मंदारबुवा रामदासी तसेच मोठ्या संख्येने सहभागी झालेले शिवभक्त यामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. वाजत-गाजत ही शोभायात्रा कथा स्थळापर्यंत पोहोचली.

कथेच्या पहिल्या दिवशी मंदारबुवा रामदासी यांनी शिवमहापुराण श्रवणाचे महत्त्व विशद केले. शिवमहापुराणाचे श्रवण हे पुण्यदायी असून, त्यातून मनुष्याला आध्यात्मिक समाधान आणि सद्मार्गाची प्रेरणा मिळते. श्रावणाच्या पवित्र महिन्यात भगवान शिवाचा महिमा ऐकण्याची संधी मिळणे हे भाविकांचे महत्भाग्य असल्याचे त्यांनी सांगितले.

या धार्मिक उपक्रमाचे कौतुक करताना मंगल भक्त सेवा मंडळाचे प्रमुख राजाभाऊ कोठारी यांनी आयोजक सुमित वर्मा व शिव मित्र प्रतिष्ठान यांच्या कार्याचे अभिनंदन केले. कुटुंबाकडून मिळालेला धार्मिक वारसा पुढे नेण्याचे कार्य सुमित वर्मा मनापासून करीत आहेत. नव्या पिढीला धर्म आणि संस्कृतीचे महत्त्व समजावून सांगण्याची जबाबदारी सर्वांची असून, अशा धार्मिक कथांमधून हे कार्य प्रभावीपणे पुढे जाऊ शकते, असे कोठारी यांनी सांगितले.कथेची सांगता महाआरतीने झाली. गांजेगल्ली येथे भाविकांसाठी भव्य मंडप उभारण्यात आला असून, दररोज महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे. प्रयास ग्रुपच्या अलका मुंदडा यांच्यासह ग्रुपच्या सदस्य तसेच परिसरातील महिला भाविक मोठ्या संख्येने कथाश्रवणासाठी उपस्थित होते. पहिल्या दिवसाच्या महाआरतीचे यजमानपद चेतन कांकरिया, रमेश सानप, सागर गुरव, चंद्रकांत मुथा , मंगल भक्त सेवा मंडळाचे पदाधिकारी व सेवेकरी तसेच सहदेव परिवार यांनी भूषविले. तसेच यावेळी राजेंद्र मालु , ओमप्रकाश मुंदडा, सुरेश चांडक , पंकज बाजिया, अभय बोरा , चेतन कांकरिया , प्रशांत मुथ्था , गोपाल वर्मा , आनंद कांकरिया, सागर गुरव , प्रणय दळवी , पवन खंडेलवाल, राहुल सारडा तसेच शिव मित्र प्रतिष्ठान चे संकेत गुरव , अनमोल कांकरिया , आदित्य आनेचा , संकेत रणसिंग , ओम दळवी , यश मुथ्था , गौरव कांकरिया, अमित लड्डा , सिद्धार्थ कांकरिया, यश सावेकर, प्रसाद भोसले , हर्ष कांकरिया , जतीन सहदेव सह शिव मित्र प्रतिष्ठान च्या सर्व सदस्यांनी या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

## आनंद तीर्थ समवशरण येथे शनिवारी ४ गुरूभक्तांच्या मास खमणचे पच्चक्खाण

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर शहरात जैन धर्मियांचा पवित्र समर्पण चातुर्मास २०२६ सुरू आहे. उपाध्याय प्रवर पूज्य श्री प्रविणऋषीजी म.सा. यांच्या या चातुर्मासात भाविक मोठ्या श्रद्धेने जप, तप, आराधना, तपस्या करत आहेत. चातुर्मासानिमित्त ४ गुरूभक्तांनी मास खमण (३१ उपवास) केले असून त्याचे पच्चक्खाण शनिवार दि. ५ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता आनंद तीर्थ समवशरण येथे होणार आहे, अशी माहिती समर्पण चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा, महामंत्री आदेश चंगेडिया, कोषाध्यक्ष विलास कटारिया यांनी दिली.

अहिल्यानगर येथील ललित गुगळे, सौ.शिल्पा नहार, राहुरी येथील सौ.भारती सुराणा आणि कु. खुशी चोरडिया यांनी गुरूदेवांच्या आशीर्वादाने ३१ दिवसांचे कडक उपवास (मास खमण) करून आत्मशुद्धीच्या मार्गावर प्रवास केला आहे. या मास खमणचे पच्चक्खाण (प्रत्याख्यान) शनिवारी महाराष्ट्र प्रवर्तक पूज्य कुंदनऋषीजी म.सा., उपाध्याय प्रवर पूज्य प्रविणऋषीजी म.सा., पूज्य आलोकऋषीजी म.सा., पूज्य तिर्थेशऋषीजी म.सा., पूज्य सत्यप्रभाजी म.सा., पूज्य अमितज्योतीजी म.सा.




आदी साधू साध्वीजींच्या पावन सान्निध्यात होणार आहे. यावेळी संगीत भक्ती (भावा) कार्यक्रम होणार असून जैन भक्तीकार वैदेही बोरा आपल्या सुमधुर आवाजात भक्तीगीते सादर करणार आहेत.

जैन धर्मामध्ये मास खमण म्हणजे सलग ३१ दिवस फक्त पाणी पिऊन केलेले कठोर उपवास होय आणि पचकावणी (पच्चक्खाण) म्हणजे या तपाचा विधीपूर्वक घेतलेला संकल्प किंवा नियम होय. आत्मशुद्धीसाठी हे महातप केले जाते. उपाध्याय प्रवर पूज्य प्रविणऋषीजी म.सा. यांच्या समर्पण चातुर्मासात भाविक श्रद्धेने उपवास करून धर्माचरण करत आहेत. आचार्यश्रींच्या जन्मोत्सव सप्ताहात शेकडो भक्तांनी अट्ठाई उपवास केले. याशिवाय मास खमण करणाऱ्या भक्तांची संख्याही वाढत आहे. आचार्यश्रींच्या पावन भूमीत होत असलेला उपाध्यायश्रींचा चातुर्मास अनेक अर्थांनी ऐतिहासिक आणि सर्वत्र भक्तीचा जागर करणारा ठरत आहे. पवित्र पर्युषण पर्वातही भाविक मोठ्या संख्येने तपस्या करणार आहेत.


या समर्पण चातुर्मासाचे मुख्य लाभार्थी मुंबईचे प्रसिद्ध उद्योगपती आणि अहिल्यानगरचे सुपुत्र तथा तिरूपती बालाजी देवस्थानचे विश्वस्त सौरभ हेमराजजी बोरा, सौ. राखी सौरभ बोरा, प्रमिलाताई हेमराजजी बोरा, पराग बोरा व बोरा परिवार आहे. मास खमण करणाऱ्या चार भाविकांचा सौरभ बोरा परिवाराच्या वतीने सोन्याचे नाणे देऊन सन्मान करण्यात येणार आहे.

शनिवारी आयोजित पच्चक्खाण कार्यक्रमास श्रावक श्राविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन समर्पण चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा, महामंत्री आदेश चंगेडिया, कार्याध्यक्ष राजेश भंडारी, कोषाध्यक्ष विलास कटारिया, उपाध्यक्ष अनिल पोखरणा, राजकुमार बोरा, विजय गुगळे, सुरेश कांकरिया, सचिन देसरडा, मनसुख गुंदेचा, सहसचिव अभय गांधी, अभिजीत गांधी, कमिटी सदस्यांनी केले आहे.

## 'पंडित दीनदयाळ स्पर्श' ही फिलाटेली विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना

**पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान व डाक विभाग यांचा संयुक्त विद्यमाने उपक्रम अहिल्यानगर मध्ये राबविणार**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी




**अहिल्यानगर–** इयत्ता ६ वी ते ९ वीच्या विद्यार्थ्यांमध्ये टपाल तिकिटे जमविण्याचा छंद निर्माण व्हावा यासाठी भारतीय टपाल खात्याने ३ नोव्हेंबर २०१७ पासून पंडित दीनदयाळ स्पर्श () ही फिलाटेली शिष्यवृत्ती योजना सुरू केली आहे.

सदर योजना अहिल्यानगर जिल्हा व शहरात पोस्ट ऑफिस आणि पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने सेवा पंधरवड्यात राबविण्यात येणार आहे.अहिल्यानगर डाक विभागाचे वरिष्ठ अधीक्षक विलास पालवे यांनी पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानचे मुकुल गंधे व कार्याध्यक्ष सुरज अग्रवाल यांच्या कडे शिष्यवृत्ती योजनेचे पत्र दिले.याप्रसंगी विश्व हिंदू परिषदेचे श्रीकांत नांदापूरकर उपस्थित होते.

या योजनेंतर्गत ज्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक आलेख उज्ज्वल आहे आणि ज्यांना टपाल तिकीट संग्रहाचा छंद आहे, अशा विद्यार्थ्यांची फिलाटेली प्रश्नमंजुषा आणि फिलाटेली प्रकल्पच्या आधारे निवड करून शिष्यवृत्ती देऊन प्रोत्साहन दिले जाते.

या योजनेसाठी मुकुल गंधे यांनी विशेष परिश्रम घेतले तर सुरज अग्रवाल यांनी पाठपुरावा केला. ही योजना अहिल्यानगर शहरातील सर्व शाळांमध्ये लवकरच राबविण्यात येणार असल्याची माहिती पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानचे संस्थापक वसंत लोढा यांनी दिली आहे.

## 'भारत : द इटर्नल'मधून चिरंतन भारताचा वैचारिक प्रवास उलगडणार!

**युवा साहित्यिक स्वप्नील खामकर यांच्या सहाव्या पुस्तकाचे रविवारी प्रकाशन । संस्कृतीपासून मानवतेपर्यंत... विचारविश्वाचा वेध!**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** भारतीय संस्कृती, विचारपरंपरा, तत्त्वज्ञान आणि मानवतेच्या सार्वत्रिक दृष्टिकोनाचा व्यापक वेध घेणारे युवा साहित्यिक तथा उद्योजक स्वप्नील खामकर यांच्या 'भारत : द इटर्नल' या सहाव्या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा रविवार, दि. ६ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता टिळक रोड येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आला आहे.

रविदासीया फाऊंडेशन (मुंबई) यांच्या वतीने आयोजित या सोहळ्यात रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष आनंदराज आंबेडकर, खासदार भाऊसाहेब वाकचौरे, आमदार संग्राम जगताप आणि आमदार काशिनाथ दाते यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अभ्युदय को-ऑप. बँकेचे माजी अध्यक्ष संदीप घनदाट, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. संजय कळमकर आणि युवा नेते अमन आंबेडकर उपस्थित राहणार आहेत. या प्रकाशन सोहळ्यास साहित्यप्रेमी, विचारवंत आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन रविदासीया फाऊंडेशनचे संस्थापक संजय खामकर आणि प्रदेशाध्यक्ष सुभाष मराठे यांनी केले आहे.

'भारत : द इटर्नल' या पुस्तकातून भारताकडे केवळ भौगोलिक राष्ट्र किंवा प्राचीन संस्कृती म्हणून न पाहता, हजारो वर्षांची वैचारिक, आध्यात्मिक आणि मानवी परंपरा असलेली चिरंतन सभ्यता म्हणून पाहण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. भारतीय विचारांमधील मानवतावाद, सार्वत्रिकता, अहिंसा, वेदान्ताचा व्यापक दृष्टिकोन, जागतिक शांतता आणि मानवएकतेची संकल्पना यांचा पुस्तकात अभ्यासपूर्ण वेध घेण्यात आला आहे. भारताच्या ज्ञानपरंपरेने जगाला दिलेल्या विचारांचा आधुनिक जगाशी असलेला संबंध, भारतीय तत्त्वज्ञानातील मानवकेंद्री दृष्टिकोन आणि भविष्यातील जागतिक समाजासाठी भारतीय विचारांचे महत्त्व यावरही पुस्तकातून प्रकाश टाकण्यात आला आहे.

भारताच्या भूतकाळाचा केवळ गौरव करण्याऐवजी, चिरंतन भारतीय विचारपरंपरेतून वर्तमान आणि भविष्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन या पुस्तकातून मांडण्यात आला आहे. त्यामुळे हे पुस्तक भारताच्या सभ्यताविषयक आणि वैचारिक प्रवासाचा व्यापक पट उलगडणारे ठरणार आहे.

'भारत : द इटर्नल' हे स्वप्नील खामकर यांचे सहावे प्रकाशित पुस्तक आहे. यापूर्वी त्यांची '८ : द गेम इज ऑन', 'द सीईओ ऑफ द माइंड', 'झिरो टू लॉन्च', 'लोकनेते सितारामजी घनदाट (जिओग्राफी)' आणि 'द बोरिंग रेव्होल्यूशन' ही पाच पुस्तके प्रकाशित झाली आहेत. लेखनासोबतच स्वप्नील खामकर हे उद्योजक म्हणूनही कार्यरत आहेत. त्यांच्या लेखनातून वैयक्तिक विकास, विचारशक्ती, उद्योजकता, समाज आणि भारताच्या व्यापक वैचारिक प्रवाहाचा विविध अंगांनी वेध घेण्यात आला आहे.

## तिळवण तेली समाज ट्रस्टच्या वतीने मंगळागौर सोहळा उत्साहात

**'मंगळागौरच्या माध्यमातून संस्कृती जपण्याबरोबरच महिलांना एकत्र आणण्याचे काम' – सौ. नीता लोखंडे**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** तिळवण तेली समाज ट्रस्ट, अहिल्यानगर यांच्या वतीने महिलांसाठी आयोजित करण्यात आलेला 'मंगळागौर सोहळा उत्साहपूर्ण आणि आनंददायी वातावरणात संपन्न झाला. ट्रस्टच्या वतीने मंगळागौर सोहळ्याचे यंदा प्रथमच आयोजन करण्यात आले होते. पहिल्याच वर्षी समाजातील महिला भगिनींनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवत कार्यक्रमाला भरभरून प्रतिसाद दिल्याने सोहळ्याला विशेष रंगत आली. पारंपरिक वेशभूषा, विविध खेळ, हास्य-विनोद आणि महिलांचा उत्साह यामुळे संपूर्ण कार्यक्रमस्थळी चैतन्याचे वातावरण निर्माण झाले होते.

मंगळागौर हा महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेतील महत्त्वाचा सण मानला जातो. बदलत्या काळातही अशा पारंपरिक उत्सवांचे महत्त्व कायम असून, नव्या पिढीपर्यंत आपल्या संस्कृतीची आणि परंपरांची ओळख पोहोचविण्याचे प्रभावी माध्यम म्हणून अशा कार्यक्रमांकडे पाहिले जाते. याच उद्देशाने तिळवण तेली समाज ट्रस्टच्या वतीने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. समाजातील महिलांना एकत्र येण्यासाठी, संवाद साधण्यासाठी, आनंदाचे क्षण अनुभवण्यासाठी तसेच आपापसांतील स्नेहबंध अधिक दृढ करण्यासाठी या कार्यक्रमाची संकल्पना करण्यात आली होती.

कार्यक्रमादरम्यान महिलांसाठी विविध पारंपरिक तसेच मनोरंजक खेळांचे आयोजन करण्यात आले. फुगड्या, उखाणे, संगीताच्या तालावर आधारित खेळ, विविध गमतीदार स्पर्धा आणि मनोरंजनात्मक उपक्रमांमध्ये महिलांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. अनेक महिलांनी पारंपरिक वेशभूषेत उपस्थित राहून कार्यक्रमाचे सौंदर्य अधिक खुलविले. खेळांदरम्यान झालेला हास्य-विनोद, उत्स्फूर्त सहभाग आणि महिलांचा जल्लोष यामुळे कार्यक्रमस्थळी आनंदाची लहर पसरली होती. पहिल्याच वर्षी आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला मिळालेला प्रतिसाद पाहता भविष्यातही अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याचा उत्साह ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांमध्ये निर्माण झाला.

यावेळी ट्रस्ट च्या अध्यक्षा सौ. नीता लोखंडे यांनी उपस्थित महिला भगिनींशी संवाद साधताना सांगितले की, "मंगळागौर हा केवळ पारंपरिक खेळ आणि मनोरंजनाचा कार्यक्रम नसून, आपल्या महाराष्ट्राच्या संस्कृतीशी आणि परंपरांशी जोडणारा उत्सव आहे. आजच्या धावपळीच्या जीवनात महिलांना एकत्र येऊन काही आनंदाचे क्षण अनुभवण्याची संधी कमी होत चालली आहे. त्यामुळे तिळवण तेली समाज ट्रस्टच्या माध्यमातून महिलांसाठी मंगळागौर सोहळ्याचे आयोजन करण्याचा प्रयत्न करण्यात आला. पहिल्याच वर्षी महिलांनी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद हा आमच्यासाठी मोठा आनंदाचा आणि प्रोत्साहनाचा विषय आहे. महिलांचा सहभाग पाहून या उपक्रमामागील उद्देश निश्चितच सफल झाल्याचे समाधान मिळत आहे."

त्या पुढे म्हणाल्या, "समाजाची प्रगती साधायची असेल तर महिलांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. महिलांना केवळ सामाजिक किंवा सांस्कृतिक कार्यक्रमांपुरते मर्यादित न ठेवता त्यांच्या कलागुणांना, विचारांना आणि नेतृत्वगुणांना व्यासपीठ मिळणे गरजेचे आहे. अशा कार्यक्रमांच्या माध्यमातून महिलांमध्ये संवाद वाढतो, नवीन मैत्री निर्माण होते आणि समाजातील आपलेपणाची भावना अधिक दृढ होते. आपल्या संस्कृतीतील चांगल्या परंपरा जपत त्या पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मध्यवर्ती, मुंबई आयोजित

# खुला राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा महोत्सव

**मुंबई –** रंगभूमीची मध्यवर्ती संघटना असलेली अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मध्यवर्ती मुंबई आयोजित, अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनानिमित्त सुरू झालेला नाट्यकलेचा जागर भव्य राज्यस्तरीय खुल्या एकांकिका स्पर्धा महोत्सवात सलग तिसऱ्या वर्षी देखील नाट्य परिषद करंडक रूपात आयोजित करण्यात आला आहे असे परिषदेचे अध्यक्ष श्री. प्रशांत दामले यांनी सांगितले.

महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातील कलावंत, नाट्यकर्मींसाठी हा स्पर्धात्मक महोत्सव राज्यस्तरावर आयोजित केला असून या स्पर्धांमध्ये महाराष्ट्रातील सर्व कलावंतांनी भाग घ्यावा असे आवाहन उपाध्यक्ष (उपक्रम) श्री. भाऊसाहेब भोईर यांनी केले आहे.

मागील वर्षी हा स्पर्धात्मक महोत्सव महाराष्ट्रातील विविध केंद्रांवर यशस्वीरित्या सादर झाला. मागील वर्षी २५८ एकांकिका या महोत्सवात सादर झाल्या, अंतिम फेरीत निवड झालेल्या कलावंतांसाठी नाट्य कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले, नाट्यक्षेत्रातील दिग्गज दिग्दर्शक, अभिनेते, अभिनेत्री यांनी गावोगावी जाऊन हे शिबिर घेतले. यामुळे अंतिम फेरीतील एकांकिका दर्जेदार झाल्या आणि यातून मागील वर्षी नाट्य परिषद करंडक स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त एकांकिका ''चिरंजीव परफेक्ट बिघडलाय'' या एकांकिकेचे व्यावसायिक नाटकात रूपांतर करून व्यावसायिक रंगभूमीवर हे नाटक सादर करण्यात आले आणि नाटकाचे आजअखेर १०० नाट्यप्रयोग झाले असून त्यातील २५ प्रयोग महाराष्ट्रभारतील नाट्य परिषदेच्या शाखांमध्ये सादर करण्यात आले, अशी माहिती अध्यक्ष श्री. प्रशांत दामले यांनी दिली.

दरवर्षी नाट्य परिषद करंडक ह्या राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार असल्याचे नाट्य परिषदेच्या नियामक मंडळ व कार्यकारी समितीने ठरविले आहे. तसेच १०० व्या नाट्यसंमेलनानिमित्त सुरू करण्यात आलेला नाट्यकलेचा जागर यातील एकपात्री स्पर्धा, नाट्यअभिवाचन स्पर्धा, नाट्यसंगीत पद गायन प्रवेश स्पर्धा यांचा देखील स्पर्धा महोत्सव घेण्याचा परिषदेचा मानस आहे.

नाट्य परिषद करंडक ही स्पर्धा प्राथमिक, विभागीय व अंतिम फेरी अश्या तीन फेऱ्यांमध्ये होणार आहे. प्राथमिक फेरी सप्टेंबर अखेर विविध केंद्रांवर होऊन यातील निवडक कलाकृतींची विभागीय फेरी तर अंतिम फेरी मुंबई येथे दिनांक २८ ऑक्टोबर २०२६ रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यसंकुल, मनमाला टँक रोड, माटुंगा – माहीम, मुंबई येथे होणार आहे.

अंतिम फेरीत निवड झालेल्या कलावंतांसाठी नाट्य कार्यशाळेचे आयोजन करण्यात येणार आहे. हे शिबिर नाट्यक्षेत्रातील दिग्गज दिग्दर्शक, अभिनेते, अभिनेत्री घेणार असून अंतिम फेरीतील सादरीकरणाचा दर्जा यामुळे सर्वोत्तम असणार आहे. महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांच्या ठिकाणी एकांकिका स्पर्धा घेण्याचा नाट्य परिषदेचा मानस आहे. ज्या जिल्ह्यातून किमान १० प्रवेशिका येतील त्याठिकाणी स्पर्धेचे केंद्र देण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील सर्व गुणवंत कलाकारांना नाट्यसंमेलनात आपली कला सादर करण्याची संधी या उपक्रमातून मिळणार आहे. तसेच सर्वोत्कृष्ट एकांकिकेका व्यावसायिक रंगभूमीवर व्हावी यासाठी नाट्य परिषद प्रयत्नशील राहणार आहे.

राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा महोत्सव

स्पर्धेच्या अंतिम फेरीसाठी रोख पारितोषिके

एकांकिका स्पर्धा सर्वोत्कृष्ट प्रथम रु. १,००,०००/-, उत्कृष्ट द्वितीय रु. ७५,०००/-, उत्तम तृतीय रु. ५०,०००/, दोन उत्तेजनार्थ पारितोषिके रु. १५,०००/- लेखन/दिग्दर्शन वैयक्तिक रोख पारितोषिके रु. ११,०००/-, रु. ७,०००/-, रु. ५०००/- स्त्री अभिनय/पुरूष अभिनय वैयक्तिक रोख पारितोषिके रु. ७,०००/-, रु. ५,०००/-, रु. ३०००/- नेपथ्य/प्रकाश योजना/पार्श्वसंगीत/रंगभूषा व वेशभूषासाठी वैयक्तिक रोख पारितोषिके रु. ५,०००/-, रु. ३,०००/-, रु. २०००/- देण्यात येणार आहेत. या स्पर्धेतील सर्व सहभागी कलावंत, तंत्रज्ञ यांना सहभागपत्र देण्यात येणार आहे. एकांकिकेसाठी प्रवेश फी रु. १०००/- ठेवण्यात आली आहे. या स्पर्धेची प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीनेच होणार असून खाली दिलेल्या लिंकवर क्लिक करून एकांकिका स्पर्धेची माहिती, नियमावली .. या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. स्पर्धेचे प्रवेश अर्ज भरण्याची शेवटची तारीख आणि वेळ दिनांक १८ सप्टेंबर २०२६ आहे.

# पेमराज सारडा महाविद्यालयात आंतरमहाविद्यालयीन जुदो स्पर्धेचे आयोजन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व अहिल्यानगर जिल्हा क्रीडा विभागीय समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरमहाविद्यालयीन जुदो स्पर्धेचे आयोजन पेमराज सारडा महाविद्यालयात करण्यात आले. या स्पर्धेत जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांमधील मुला-मुलींच्या मिळून एकूण १४ संघांनी सहभाग नोंदविला.

स्पर्धेच्या उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित होत्या. यावेळी मार्गदर्शन करताना त्यांनी जुदो या खेळाचा महिला सक्षमीकरणासाठी होणारा उपयोग अधोरेखित केला. जुदोमधील विविध डावपेच व तंत्रे महिलांच्या स्वसंरक्षणासाठी उपयुक्त असून, महिलांमध्ये आत्मविश्वास व सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यास हा खेळ महत्त्वाची भूमिका बजावतो, असे त्यांनी सांगितले.

यावेळी अहिल्यानगर कुस्ती महासंघाचे सहसचिव निलेश मदने यांनी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. तसेच



अहिल्यानगर जिल्हा क्रीडा विभागीय समितीचे सचिव प्रा. डॉ. सतीश चोरमले यांनी खेळाडूंना मार्गदर्शन करून आगामी स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.

महाविद्यालयाचे माजी क्रीडा संचालक प्रा. संजय धोपावकर यांच्या मार्गदर्शनाखाली सदर स्पर्धा यशस्वीरीत्या पार पडल्या. स्पर्धेसाठी पंच म्हणून शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या डॉ. मनीषा पुंडे,आंतरराष्ट्रीय खेळाडू आदित्य धोपावकर, पोलीस उपनिरीक्षक श्री. गणेश लांडगे, श्री. भूषण घाटविसावे व श्री. दातरंगे, श्री विशाल मेहेत्रे यांनी काम पाहिले.

हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष ॲड. अनंत फडणीस, कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी, मानद सचिव श्री. संजय जोशी, जुनियर कॉलेज कमिटीचे चेअरमन श्री.मधुसूदन सारडा यांनी या कार्यक्रमाला शुभेच्छा दिल्या.

स्पर्धेचे सूत्रसंचालन प्रा. अक्षय कर्डिले यांनी केले, तर आभारप्रदर्शन प्रा. संजय साठे यांनी केले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, क्रीडा विभाग व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# 'एसा'च्या सामाजिक उपक्रमातून 'अनाम प्रेम' प्रकल्पाला संगणक भेट



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–**आर्किटेक्ट्स, इंजिनीअर्स अँड सर्व्हेअर्स असोसिएशन (एसा), अहिल्यानगर यांच्या सामाजिक उपक्रमाचा एक भाग म्हणून संचालक मंडळ व संस्था सभासदांसाठी 'अनाम प्रेम' प्रकल्प भेट आणि रक्षाबंधन उपक्रम राबविण्यात आला. निंबळक येथील खडकाळ डोंगरात, जिथे गवतही उगवणार नाही अशा ठिकाणी 'अनाम प्रेम'च्या कार्यकर्त्यांनी अंध, अपंग व मूकबधिर मुलांसाठी नंदनवन उभे केले आहे. त्यांच्या समर्पित वृत्तीने केलेल्या कार्यामुळे अनेक मुलांचे आयुष्य उजळून निघाले आहे.
या प्रकल्पाला भेट दिल्यानंतर पावलोपावली दिसणाऱ्या विविध सुविधा तसेच मुलांच्या चेहऱ्यावरील समाधान पाहून या कार्याची प्रचिती उपस्थितांना आली. जीवनातील आनंद केवळ ऐश्वर्य, आराम आणि पैसा कमावून स्वतःला सुखी ठेवण्यात नसून, इतरांना आनंदी पाहून त्यात समाधान मानण्यात आहे, याचे द्योतक अजित माने सर, अनिता ताई आणि संपूर्ण 'अनाम प्रेम' टीमच्या कार्यातून दिसून येते.
'एसा'च्या संचालक मंडळाने मागील वर्षी शिशु संगोपन येथे रक्षाबंधनानिमित्त शाळेतील मुली व त्यांच्या संस्थेसाठी उपयोगी ठरेल असा संगणक भेट दिला होता. यंदाही संचालक मंडळाच्या वतीने 'अनाम प्रेम' संस्थेला एक संगणक भेट देण्यात आला. या संगणकाचा उपयोग तेथील मुलांना संगणक साक्षर करण्यासाठी निश्चितपणे होणार आहे. दरम्यान, 'एसा'च्या एका सभासदाने १०० पॅकेट फरसाण-मुरमुरे 'अनाम प्रेम' येथील मुलींसाठी दिले.
अजित माने व अनिता माने तसेच संपूर्ण 'अनाम प्रेम' परिवाराने 'अनाम प्रेम'ची स्थापना करण्यापासून ते संस्थेचा विस्तार करण्यापर्यंत आपले पूर्ण आयुष्य समर्पित भावनेने व्यतीत केले आहे.
'अनाम प्रेम' निंबळक येथील सर्व काम विष्णू वारकरी पाहत असून त्यांनी उपस्थितांना प्रकल्पातील विविध सुविधा व उपक्रमांची माहिती दिली. आमिन हा विद्यार्थी 'अनाम प्रेम'मध्ये आपले शिक्षण पूर्ण केल्यानंतर आता तेथील एका विभागाची जबाबदारी सांभाळत आहे.
या विषयी माहिती देताना 'अनाम प्रेम'चे अध्यक्ष अजित माने यांनी सांगितले की, २००५ साली अंध, अपंग, दिव्यांग आणि मूकबधिर मुलांसाठी 'सत्यमेव जयते ग्राम', रवीनंदा संकुल येथे संस्थेच्या कार्याची सुरुवात करण्यात आली. संस्था शिक्षण, प्रशिक्षण, रोजगार व पुनर्वसन या चतुःसूत्रीवर लोकसहभागातून कार्य करत आहे. 'अनाम प्रेम'मध्ये सध्या २३५ अंध, अपंग, मूकबधिर व गतिमंद मुले-मुली वास्तव्यास आहेत. पुणे, नगर व संभाजीनगर येथे संस्थेचे विविध प्रकल्प कार्यरत आहेत.
येथील मुलांनी स्वावलंबी व्हावे, त्यांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात तसेच त्यांची दैनंदिन दिनचर्या आणि संस्थेचा खर्च भागविण्यास मदत व्हावी, या उद्देशाने चप्पल कारखाना, धूप-अगरबत्ती निर्मिती, सॅनिटरी नॅपकिन निर्मिती यांसारखे विविध लघुउद्योग चालविले जात आहेत.
याशिवाय भविष्यात आणखी नवीन उपक्रम हाती घेण्यासाठी संस्थेचा शोध सुरू असल्याचे अजित माने यांनी सांगितले.
'अनाम प्रेम'ने उभारलेल्या या प्रकल्पाला सर्वांनी आवर्जून भेट द्यावी आणि शक्य असल्यास संस्थेने हाती घेतलेल्या विविध उपक्रमांना सहकार्य करावे, असे आवाहन 'एसा'चे अध्यक्ष प्रदीप तांदळे यांनी केले.
या उपक्रमास 'एसा'चे उपाध्यक्ष सुनील औटी, सचिव भूषण पांडव, संतोष खांडेकर, अनमोल जैन, साजिद शेख, अमोल येनगंदुल, संतोष राजापुरे, महेश तांदळे, रमेश बोऱ्हूडे, आदिनाथ आंबेकर, गौरव मांडगे, सचिन डागा, रोशन गुगळे, सागर ढगे, संदीप पाटील, रोहित लुणिया, राकेश राऊत हे सभासद व त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.
तसेच विविध क्षेत्रांतील अतिथींमध्ये पं. स. उपसभापती डॉ. दिलीप पवार, महेश घावटे, सौ. नीताताई घावटे, प्रणाली तांदळे, तरन्नुम मॅडम, फरहीन मॅडम, वंदना कुलकर्णी, मोनालीताई बोरूडे, प्राची ताई, ॲड. किरण जाधव, इंजि. प्रशांत आढाव, इंजि. अनिल धोकरिया, शिवगुंडे सर आदी उपस्थित होते. यावेळी 'अनाम प्रेम'च्या वतीने आर्केस्ट्रा असलेल्या चमूतील गौरी इंगळे तसेच इतर गायकांनी विविध गाणी सादर केली. या सांगीतिक कार्यक्रमामुळे उपस्थितांना आनंददायी वातावरणाचा अनुभव मिळाला.

# चारा छावण्या सुरू करा – मनसे जिल्हाध्यक्ष अविनाश पालवे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पाथर्डी –** यावर्षी संपूर्ण महाराष्ट्रात पावसाने पाठ फिरवली असून दुष्काळ सदृश्य परिस्थिती असल्याने तालुक्यात पाण्याचे टँकर आणि जनावरांसाठी चारा छावण्या सुरू करा अशी मागणी तहसीलदार उद्धव नाईक यांच्याकडे मनसे जिल्हाध्यक्ष अविनाश पालवे यांनी केली आहे.

मनसेच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनात पालवे यांनी म्हटले आहे की, पाथर्डी तालुक्यात यावर्षी अत्यंत कमी पाऊस झाल्याने आज दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली आहे तालुक्यातील सर्व तलाव, विहिरी कोरड्या पडल्या असून पाण्यावाचून माणसांचे व चाऱ्यावाचून जनावरांचे प्रचंड हाल होत आहेत अशा परिस्थितीत मागेल तिथे टँकर देणे व प्रस्ताव आल्यावर विलंब न



लावता तात्काळ मंजुरी देऊन टँकर सुरू होणे तसेच जनावरांना चाऱ्यासाठी चारा छावण्या अथवा चारा डेपो सुरू करणे अत्यंत गरजेचे आहे तरी आपण आपल्या यंत्रणेमार्फत तालुक्यात जिथे गरज आहे तिथे तात्काळ चारा छावण्या सुरू कराव्यात व त्यासाठी आजपासूनच कार्यवाही सुरू करण्यात यावी कारण आज परिस्थिती आहे त्यापेक्षा बिकट परिस्थिती येत्या १५ ते २० दिवसानंतर होणार आहे त्यासाठी आपण आजच तयारी करणे गरजेचे आहे तरी आपण शेतकऱ्यांचे पशुधन वाचवण्यासाठी आमच्या मागणीचा सकारात्मक विचार करून तालुक्यात चारा छावण्या सुरू करण्यासाठी कार्यवाही कराल व आमच्यावर आंदोलनाची वेळ येणार नाही ही अपेक्षा असे निवेदनात म्हटले आहे.
यावेळी उपजिल्हाध्यक्ष देविदास हंडाळ, तालुकाध्यक्ष संतोष जिरेसाळ, अक्षय उराडे , संतोष पवार, सरपंच अशोक गाडे, सरपंच दादासाहेब शेंबडे, नवनाथ वाघ, ग्रा. पं. सदस्य परमेश्वर तिरखुंडे, बबन शिंदे, सुभाष शिंदे, राजेंद्र खेडकर यांसह शेतकरी बांधव उपस्थित होते.

# देवस्थान ही आपल्या श्रद्धेची केंद्रे – आ. काशिनाथ दाते सर

**खातगाव टाकळी येथे सभामंडप लोकार्पण**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर –** धार्मिक श्रद्धा आणि विकासकामांचा सुंदर संगम घडवत तिर्थक्षेत्र विकास निधी अंतर्गत खातगाव टाकळी येथील गोरक्षनाथ मंदिराच्या २५ लक्ष रुपये निधीतून सभामंडपाचे लोकार्पण पारनेर नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या सभामंडपामुळे मंदिरातील धार्मिक कार्यक्रम, भजन-कीर्तन, प्रवचन तसेच विविध सामाजिक उपक्रमांसाठी ग्रामस्थांना चांगली सुविधा उपलब्ध झाली आहे.

यावेळी बोलताना आमदार काशिनाथ दाते सर म्हणाले, ''देवस्थान ही आपल्या श्रद्धेची केंद्रे असण्याबरोबरच गावच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य भाग आहेत. गोरक्षनाथ मंदिराच्या सभामंडपामुळे ग्रामस्थांची अनेक वर्षांची गरज पूर्ण झाली आहे. या परिसरातील धार्मिक परंपरा जपत विकासकामांना चालना देणे, हीच आपली भूमिका आहे.''
''मतदारसंघाचा विकास हा केवळ एका गावापुरता मर्यादित न राहता प्रत्येक गावाच्या गरजेनुसार झाला



पाहिजे. रस्ते, पाणी, सिंचन, मंदिर परिसर, सभामंडप, मूलभूत सुविधा अशा विविध कामांना शासनाच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून देत अनेक कामे सुरू आहेत, तर काही कामे पूर्णत्वाच्या मार्गावर आहेत. दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना पाण्याचा शाश्वत आधार मिळावा, यासाठी उपसा सिंचन योजनांसह मोठ्या जलप्रकल्पांच्या पाठपुराव्यालाही प्राधान्य दिले जात आहे,'' असे त्यांनी सांगितले.
ते पुढे म्हणाले, ''विकासकामे करताना गावागावातील नागरिकांच्या मागण्या आणि स्थानिक गरजा लक्षात घेतल्या जात आहेत. धार्मिक स्थळांचा विकास असो, ग्रामीण रस्त्यांचा प्रश्न असो किंवा सिंचन व पाणीप्रश्नप्रत्येक विषय शासनदरबारी मांडून तो मार्गी लावण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. भविष्यातही खातगाव टाकळीसह संपूर्ण मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी आपण कटिबद्ध आहोत.''
मतदारसंघात रस्ते व दळणवळणाची कामे, विविध देवस्थानांच्या सभामंडपांची कामे, मंदिर परिसर सुशोभीकरण, पाणी व सिंचनाशी संबंधित प्रकल्प तसेच गावनिहाय मूलभूत सुविधांची कामे टप्प्याटप्प्याने मार्गी लावली जात आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील विकासाला अधिक व्यापक स्वरूप मिळत असून, स्थानिक नागरिकांच्या मागण्यांना प्राधान्य देण्याचा प्रयत्न केला जात आहे.

यावेळी बापु सोनवणे, सरपंच सौ. रुथा वैराळ, उपसरपंच धीरज कुलट, ह.भ.प. आदिनाथ कुलट गुरुजी, ह.भ.प. सर्जेराव जपे गुरुजी, मिटूशेठ कुलट, ज्ञानेश्वर पठारे, नवनाथ ताकपेरे, उत्तमराव कुलट, सुदर्शन कुलट, सुनील कुलट, सोपान पठारे, अतुल कुलट, अमित सातपुते, रमेश कुलट, बबन सातपुते, आबासाहेब कुलट, रंगनाथ कुलट, छबुराव काडेकर, श्रीकांत कर्डिले साहेब आदी मान्यवरांसह स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

(पान १ वरून)

## डीजे मुक्त गणेशोत्सव साजरा करा;

अधिक शोभा येईल.त्यामुळे अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व सार्वजनिक गणेश मंडळांनी,कार्यकर्त्यांनी आणि भाविकांनी एकत्र येऊन डीजे मुक्त गणेशोत्सव साजरा करून संपूर्ण राज्यासमोर एक आदर्श निर्माण करावा,असे आवाहन विश्व हिंदू परिषदेचे जिल्हामंत्री अनिल जोशी यांनी केले आहे.

## कुंटणखान्यावर छाप्यात दोन महिलांची सुटका

ही महिला तिच्या राहत्या घरातून कुंटणखाना चालवत असल्याची गुप्त माहिती पथकाला मिळाली होती. माहितीची खात्री करण्यासाठी पथकाने प्रथम बनावट ग्राहक पाठवला. खात्री पटताच छापा टाकून संशयित आरोपी झिनत हिला ताब्यात घेण्यात आले. घरझडतीदरम्यान तेथे दोन पीडित महिला मिळून आल्या. आरोपी महिला स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी आणि उपजीविकेसाठी
ग्राहकांकडून पैसे घेऊन या महिलांकडून सक्तीने वेश्याव्यवसाय करून घेतअसल्याचे तपासात स्पष्ट झाले. पोलिसांनी दोन्ही पीडित महिलांची सुटकाकेली. या प्रकरणी आरोपी झिनत फैय्याजअली महंमद या ४४ वर्षीय महिलेविरुद्ध कोतवाली पोलीस ठाण्यात अनैतिक व्यापार (प्रतिबंधक) कायदा १९५६ च्या कलम ३, ४, ५, ७ आणि ८ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
पथकात यांचा सहभागपोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षणार्थीपोलीस उपअधीक्षक कल्पना पवार आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षकसंतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक संदीप दरवडे,
पोलीस अंमलदार विष्णू भागवत, योगेश भिंगारदिवे, विकास साळवे, सागर ससाणेआणि महिला अंमलदार भाग्यश्री भिटे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

## महाराष्ट्र कारागृह ध्वज दिन जिल्हा कारागृहात साजरा

व गिटारवादक गिरीराज जाधव, गायक व पियानोवादक नरेंद्र साळवे आणि तबलावादक सार्थक डावरे यांनी देशभक्तीपर व भक्तीगीतांचेसादरीकरण करून संपूर्ण परिसर देशभक्तीमय केला.
तसेचकारागृहातील वरिष्ठलिपीक सुनीता धर्माधिकारी यांनीही देशभक्तीपर गीते सादर केली.हा उपक्रम कारागृह व सुधारसेवेचे अपर पोलिस महासंचालक डॉ. सुहास वारकेयांच्या संकल्पनेतून तसेच विशेष कारागृह महानिरीक्षक योगेश देसाई व नाशिक
विभागाच्या कारागृह उपमहानिरीक्षक अरुणा मुगुटराव यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी तुरुंगाधिकारी विजय सोळंके, वैद्यकीयअधिकारी सुजाता सानप, सुभेदार संजय शिंदे, हवालदार सुनील विधाते, गणेश
बेरड, सूर्यकांत ठोंबरे, संदीप जऱ्हाड, राहुल पठारे, नंदकुमार शिंदे, श्रीकांत गोरावडे, किरण डमाळे, चंद्रशेखर आठरे, करण बेंद्रे, माधुरी धनाडआणि समिंद्रा पवार यांच्यासह कारागृह कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.
गुन्हेगारीपासून परावृत्त करण्यासाठीअशा कार्यक्रमांची गरज –
संतोष कवारबंद्यांना गुन्हेगारीपासून परावृत्त करण्यासाठी, त्यांच्यात देशभक्तीजागृत करण्यासाठी आणि मानसिक स्वास्थ्यासाठी अशा कार्यक्रमांची अत्यंतगरज आहे, असे मत कारागृह अधीक्षक संतोष कवार यांनी व्यक्त केले. या वेळीआर्ट ऑफ लिव्हिंगचे सुभाष गड्डम उपस्थित होते. बंद्यांनी या कार्यक्रमाला
उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

## सभापती प्रा. शिंदेंच्या पाठपुराव्याने भैरवनाथ उपसा सिंचन योजना होणार

तयार करून प्रशासकीय मान्यतेसाठी शासनाकडे सादर करण्यात आले होते. त्यानुसार एकूण ८६ लाख २४ हजार ५८७ रुपये इतक्या अंदाजपत्रकीय रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. ही प्रशासकीय मान्यता महाराष्ट्र शासनाच्या मृद व जलसंधारण विभागाच्या शासन निर्णय क्रमांक नप्रमा-२०२६/प्र.क्र.४९१/जल-९, दि. ४ सप्टेंबर २०२६ अन्वये देण्यात आली आहे. मिरजगाव परिसरातील शेतकर्यांना शाश्वत सिंचनाची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने या योजनेच्या प्राथमिक सर्वेक्षण व अन्वेषणाच्या कामाला मिळालेली प्रशासकीय मान्यता महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे.

## सीना योग महाविद्यालयाचे दिमाखात उद्घाटन

अधिक काळ योगशिक्षणाचा प्रसार सुरू आहे. याच पार्श्वभूमीवर यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने योगविद्याधामला एम.ए. योगशास्त्र अभ्यासक्रम सुरू करण्याची परवानगी दिली आहे. त्यामुळे योगक्षेत्रात उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अहिल्यानगरमध्येच एक महत्त्वाची शैक्षणिक संधी उपलब्ध झाली आहे. कोणत्याही शाखेतील पदवीधर विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रमाला प्रवेश घेता येणार असल्याने विविध क्षेत्रातील तरुणांना योगशास्त्राचा शास्त्रशुद्ध अभ्यास करण्याची संधी मिळणार आहे.

उद्घाटनप्रसंगी बोलताना उपमहापौर धनंजय जाधव यांनी योगविद्याधामशी असलेले आपले कौटुंबिक नाते सांगितले. ते म्हणाले की, ''माझे वडील कृष्णा जाधव हे त्यावेळच्या नगरपालिकेचे उपाध्यक्ष होते. तसेच ते योगविद्याधामचेही उपाध्यक्ष होते. त्यांनी याच संस्थेत योगाचे शिक्षण घेतले होते. सिद्धीबाग योग हॉलमध्ये ते अखेरपर्यंत योगाभ्यास करत होते. त्यामुळे या संस्थेच्या कार्याचा आणि योगविद्याधामचा मला विशेष अभिमान आहे. योगविद्याधामने ४१ वर्षांच्या प्रदीर्घ वाटचालीत योगविद्येचा प्रचार-प्रसार करत अनेक योगशिक्षक घडविले आहेत. बदलत्या जीवनशैलीमुळे निर्माण होणाऱ्या विविध समस्या, वाढता ताणतणाव आणि आरोग्यविषयक आव्हानांच्या पार्श्वभूमीवर योगाचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. अशा परिस्थितीत योगशास्त्राला शैक्षणिक अभ्यासक्रमाची जोड मिळणे ही अहिल्यानगरसाठी निश्चितच महत्त्वाची बाब असल्याचे यावेळी उपस्थितांनी नमूद केले.

उपमहापौर जाधव यांनी पुढे सांगितले की, कोणत्याही शाखेचा पदवीधर विद्यार्थी एम.ए. योगशास्त्र हा अभ्यासक्रम करू शकतो. त्यामुळे शहरातील तसेच परिसरातील जास्तीत जास्त तरुण पदवीधरांनी या शैक्षणिक संधीचा लाभ घ्यावा आणि योगशास्त्राचे ज्ञान आत्मसात करून या क्षेत्रात करिअर करण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुंदर गोरे यांनी योगविद्याधामच्या ४१ वर्षांच्या कार्याचा आढावा घेत संस्थेच्या पुढील वाटचालीबाबत माहिती दिली. योगशिक्षण अधिक व्यापक करण्यासाठी तसेच योगशास्त्राला उच्च शिक्षणाची जोड देण्यासाठी सीना योग महाविद्यालयाची सुरुवात करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. योगविद्येच्या माध्यमातून समाजामध्ये आरोग्य, शिस्त आणि सकारात्मक जीवनशैलीचा संदेश पोहोचविण्याचे कार्य पुढेही सुरू राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमास संस्थापक सदस्य दत्ता दिकोंडा, जयंत वेसीकर, अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे सरव्यवस्थापक सुरेश पाटील, रूपेश झंवर यांच्यासह सुमारे शंभर योग शिक्षक, संस्थेचे पदाधिकारी व योगप्रेमी उपस्थित होते. वर्धापन दिन आणि सीना योग महाविद्यालयाच्या उद्घाटनामुळे योगविद्याधामच्या कार्याला नव्या शैक्षणिक पर्वाची सुरुवात झाली आहे.